## प्रेसनोट दिनांक १२/०४/२०२४

## सोलापूर शहर गुन्हे शाखेकडून, ०२ घरफोडी व ०१ चोरीचा असे ०३ गुन्हे उघडकीस.

---

**दिनांक २२/०३/२०२४ रोजी,** जोडभावी पेठ पोलीस ठाणे, सोलापूर शहर हद्दित रात्रीचे सुमारास, रघोजी ट्रान्सपोर्ट येथून ०१ टॅब, एकलव्य करिअर ॲकॅडमी येथून ०२ मोबाईल फोन तसेच एस.बी.आय. कॉलनी येथून, ०१ मोबाईल फोन चोरीस गेले होते. त्याबाबत, जोडभावी पेठ पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे गु.र.नं.१६२/२०२४ भा.द.वि.क.३८० अन्वये गुन्हा दाखल आहे.

**त्याचपमाणे, दिनांक २५/०३/२०२४ रोजी,** जोडभावी पेठ पोलीस ठाणे, सोलापूर शहर हद्दित, मार्केट यार्ड, सोलापूर समोरील दुकान गाळ्याचे शटर उचकटून ०२ मोबाईल चोरी झाले बाबत, जोडभावी पेठ पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १६३/२०२४ भा.द.वि.क.३८०, ४५४, ४५७ अन्वये गुन्हा दाखल आहे.

**तसेच, दिनांक २८/०३/२०२४ रोजी,** जेलरोड पोलीस ठाणे, सोलापूर शहर हद्दित, मार्केट यार्ड सोलापूर येथे भुसार गाळ्याचे शटर उचकटुन, दुकानातील रोख रक्कम व HIK VISION कंपनीचा DVR चोरी झाल्याने, जेलरोड पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे गु.र.नं.१३१/२०२४ भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल आहे.

वरील नमूद तिन्ही चोरीचे घटनास्थळी, गुन्हे शाखेकडील सपोनि/जीवन निरगुडे व त्यांचे तपास पथक यांनी, भेट दिली. सदर ठिकाणी मिळुन आलेली तांत्रिक माहिती तसेच मिळालेल्या गोपनिय बातमीच्या आधारे, सपोनि/ जीवन निरगुडे व त्यांचे तपास पथकाने **०२ विधी संघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेऊन,** त्यांच्याकडे विचारपूस केली असता, त्यांनी वरील प्रमाणे दाखल **०३ गुन्हे केले असल्याची माहिती दिली.** त्यानंतर, त्यांचेकडून **सदर गुन्ह्यात चोरीस गेलेले DVR, रोख रक्कम, ०४ मोबाईल फोन व एक टॅब असा एकुण ५६,२६०/- रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करणेत आला आहे.**

सदरची कामगिरी मा. श्री. एम. राज कुमार, पोलीस आयुक्त सोलापूर शहर, डॉ. दीपाली काळे, पोलीस उप- आयुक्त, गुन्हे, श्रीमती प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि/जीवन निरगुडे पोलीस अंमलदार दिलीप किर्दक, वाजीद पटेल, योगेश बर्डे, संजय साळुंखे, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड, रत्ना सोनवणे, सतिश काटे आणि सायबर पोलीस ठाणे कडील अविनाश पाटील, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड, यांनी केली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**यांचे करीता.**

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner